University of Mumbai

**मुंबई विद्यापीठ**

**परिपत्रकः**

**विषयः मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभागात शिक्षण घेत असलेल्या व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या व शेतमजूरांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबत**

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या व शेतमजूरांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफी करण्याचा निर्णय मुंबई विद्यापीठाने घेतला आहे.

याबाबत खालील निकषांच्या आधारे परीक्षा शुल्क माफ करण्याचे ठरविण्यात आले आहे:

**परीक्षा शुल्कमाफी देण्यासाठीचे निकष:**

- **अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफीचे निकष पुढीलप्रमाणे**

  १. विद्यार्थ्यांच्या पालकांचे नाव तहसिलदार कार्यालयाने केलेल्या नुकसानीच्या पंचनाम्यामध्ये असावे व नुकसान किमान ३३ टक्क्यांपेक्षा जास्त असावे.
  २. विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू.८,००,०००/— चे आत असावे.
  ३. ज्या शिष्यवृत्तीमध्ये परीक्षा शुल्क शासनाकडून दिले जाते अशा कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ न मिळणारे विद्यार्थी

- **अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतमजुरांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफीचे निकष पुढीलप्रमाणे**

  १. विद्यार्थ्यांच्या पालकांचे नाव शासनाच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या यादीत अथवा कामगार कल्याण मंडळाच्या यादीत असल्याचा सक्षम अधिकाऱ्यांचा दाखला
  २. ज्या शिष्यवृत्तीमध्ये परीक्षा शुल्क शासनाकडून दिले जाते अशा कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ न मिळणारे विद्यार्थी

तरी तहसिलदार कार्यालयाने केलेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची प्रत संबंधीत महाविद्यालयांनी तहसिल कार्यालयातून घ्यावी व प्राचार्यांनी नोंदीची खात्री करून तसे अर्जावर प्रमाणित करावे. मुंबई विद्यापीठातील विभागातील विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून पंचनाम्याची साक्षांकीत प्रत मागवावी.

विहित नमुन्यातील अर्ज महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी व विद्यापीठ विभागांनी **विद्यार्थी विकास विभाग, पहिला मजला, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई येथे दि. १० डिसेंबर २०१९** पुर्वी पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

**कुलसचिव,**
**मुंबई विद्यापीठ**

**मुंबई : ४०० ०२०**
**दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१९**

प्रत: विद्यापीठ विभागाचे प्रमुख व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठात शिक्षण घेत असलेल्या व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या/शेतमजूरांच्या पाल्यांना परीक्षा शुल्क माफीसाठीचा अर्जाचा नमुना

१. विद्यार्थ्याच नाव:---------------------------------------------------

२. महाविद्यालय/ विद्यापीठ विभागाचे नाव: ------------------------------------

३. विद्याशाखा : -----------------------------------------------------

४. अभ्यासक्रम:-----------------------------------------------------

५. वर्ग : -------------- तुकडी -------- क्र.-----पीआरएन क्र:---------------

६. निवासाचा पत्ता: --------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

७. कायमचा पत्ता: ----------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

८. ईमेलआयडी ----------------मोबाईल क्र -------व्हॉटसअप क्र ---------------

९. विद्यार्थ्याचा आधारकार्ड क्र: -------------------------------------------

१०. विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव:--------------------------------

### प्राचार्य/विद्यापीठ विभागप्रमुखांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु.............................................................हा/ही ... .................................................................................................या महाविद्यालयाचा/विद्यापीठ विभागाचा नियमित विद्यार्थी/ विद्यार्थिनी असून ...........................या वर्गात शिकत आहे. त्याचे/ तिचे पालक श्री./श्रीमती ...............................................यांचे नाव अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या....................गावाच्या, तालुका ............ जिल्हा......... .....शासकिय पंचनाम्यामध्ये .......क्रमांकावर आहे/ नाव महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या/ कामगार कल्याण मंडळाच्या यादित समाविष्ट आहे.

श्री/श्रीमती/कु................................................यास/हिस शासनाकडून परीक्षा शुल्क मिळणारी कोणतीही शिष्यवृत्ती प्राप्त होत नाही.

श्री/श्रीमती/कु................................................यास/हिस परीक्षाशुल्कात सवलत देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक:

स्थळ : प्राचार्यांची/विभाग प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का

*वरील नमुना अर्जासोबत जोडावे:*

*१) उत्पन्नाचा दाखला*

*२) रेशनकार्ड व आधारकार्डाची प्रमाणित प्रत*

*३) पंचनाम्यातील नोंदअसलेल्या पृष्ठाची प्रत /महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या/ कामगार कल्याण मंडळाच्या यादित नाव असल्याचा सक्षम अधिकाऱ्याचा दाखला*